# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५१८ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक २५/०९/२०१८

## "विनयभंग करणाऱ्या आरोपीस एक वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे कारधा (ग्रामीण) अंतर्गत ग्राम दवडीपार बाजार येथील पिडीत मुलगी, वय १८ वर्ष, जात–गोंड हिला बाजारात जाने असल्याने दिनांक १८/६/२०१६ चे सायंकाळी ५.०० वा. सुमारास मोठया आईचा मुलगा गावात क्रिकेट खेळत असतांना त्यास घरी बोलावले तेव्हा त्याचे सोबत खेळत असलेला नामे कवळु उर्फ वनवास विनायक मोदनकर, वय २१ वर्ष रा. दवडीपार बाजार याने पिडितेस उद्देशुन अश्लिल शिवीगाळ केली असल्याचे मोठे आईचे मुलाने घरी येवुन सांगीतल्याने पीडीत मुलगी हिने कवळु मोदनकर यास, मला शिवीगाळ का केली म्हणुन विचारण्यास गेली असता कवळु मोदनकर याने पिडित मुलीस शारिरीक आगळीक करून अश्लिल शिवीगाळ केली यावरून पिडित मुलगी हिने त्यास प्रतीकार केला असता आरोपीने किरकोळ मारपीट करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. पिडीत मुलीने घडलेल्या घटनेसंबधी पोलीस ठाणे कारधा (ग्रामीण) येथे सदर ईसमा विरूध्द कार्यवाही करीता दिलेली तक्रार व वैद्यकीय परिक्षण रिपोर्टवरुन तात्काळ अपराध क्र. ६४/२०१६ कलम ३५४,२९४,३२३,५०६ भादवी तसेच तक्रारदार हे विशेष जाती प्रवर्गातील असल्याने सहकलम ३(१)(११) अजाजअप्रका अन्वये आरोपी विरूध्द दिनांक १९/६/२०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

**अल्पवयीन मुलांच्या साक्षी ठरल्या महत्वाच्या :–** पिडितेचे मोठे आईचा मुलगा क्रिकेट खेळत असता त्यास बाजारात जाण्यास बोलावण्यास गेली असता आरोपीने पिडिते सोबत केलेल्या कृत्याचे, प्रत्येक्षदर्शी क्रिकेट खेळणारे अल्पवयीन मुले यांच्या योग्य साक्षी न्यायालयात आरोपीस शिक्षा होण्यास महत्वाच्या ठरल्या.

सदर गुन्हयांचा तपास **श्री. संजय जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग भंडारा** यांनी घटणास्थळ गाठुन तपास सुरु केला व गुन्हयातील आरोपी कवळु उर्फ वनवास विनायक मोदनकर, वय २१ वर्ष रा. दवडीपार बाजार यास तात्काळ अटक केले व साक्ष पुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावा मिळुन आल्याने आरोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोप पत्रास केस क्र. १७/२०१६ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयांची सुनावणी **अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे न्यायालयात चालली, गुन्हयांत सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. रमाकांत खत्री सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र

न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २५/९/२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन आरोपी नामे कवळु उर्फ वनवास विनायक मोदनकर वय २१ वर्ष रा. दवडीपार बाजार यांचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३५४ भादवी मध्ये एक वर्ष सश्रम कारावास व ५०००/—रु दंड, दंड न भरल्यास ३ महिणे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली सदर द्रव्य दंडाचे रकमे पैकी ३०००/—रु पिडीतेला भरपाई रक्कम म्हणुन देण्याचे आदेश दिले**. सदर

गुन्हयात पोलीस निरीक्षक श्री. जी. आर. कंकाळे, ठाणेदार पोलीस ठाणे कारधा (ग्रामीण) यांचे मार्गदर्शनात पो. हवा. सिताराम ब्राम्हणकर ब.न. ७१ पो. स्टे. कारधा (ग्रामीण) यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**(जितेद्रं के. आडोळे)**
**पोलीस उपनिरीक्षक**
**जनसंपर्क अधिकारी**
**संपर्क क्र. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती
दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.